आवश्यक आहे. मागासवर्गीयांसाठी राखीव असलेल्या जागा मागासवर्गीयांमधूनच भरावयाच्या आहेत. त्यामुळे अशा जागांवर बिगर मागासवर्गीय कर्मचाऱ्यांची बदली करुन आणू नयेत. म्हणून एखादा मागासवर्गीय कर्मचारी जर एका विभागातून दुसऱ्या विभागात विनंती बदली मागितली आणि ज्या ठिकाणी बदली केली आहे त्या ठिकाणी जर मागासवर्गीयांचा अनुशेष शिल्लक असेल तर अशा वेळी मागासवर्गीय कर्मचाऱ्याची बदली झालेल्या विभागात संबंधित १०० बिंदू नामावलीमध्ये बिगरमागासवर्गीयांसाठी असलेल्या बिंदूच्या ठिकाणी करण्यात यावी.

उदा: मुंबई विभागात १०० बिंदू नामावलीमध्ये नोंद असलेल्या ५ अनुसूचित जमातीच्या व्यक्तींची बदली सांगली विभागात करण्यात आलेली आहे आणि सांगली विभागात १०० बिंदू नामावलीनुसार अनुसूचित जमातीचा ५ चा अनुशेष आहे. तेव्हा अशा प्रकरणी सांगली विभागात बदलून आलेल्या ५ अनुसूचित जमातीच्या व्यक्तींची १०० बिंदू नामावलीत बिगरमागासवर्गीयांसाठी असलेल्या बिंदूच्या ठिकाणी दाखवावे. म्हणजे सांगली विभागातील अनुशेषावर यामुळे कोणताही परिणाम होणार नाही.

[८] विनंती बदली ही प्रादेशिक विभागांतर्गत/विभागीय कमिटीत करण्यात येईल व नंतर प्रादेशिक व्यवस्थापक / विभाग नियंत्रक त्यांची बदली करतील. कर्मचाऱ्यांची ठराविक ठिकाणी बदली केली जाणार नाही.

[९] विनंतीवरुन बदलीसाठी नेहमीच्या अटी जसे [१] ज्येष्ठताक्रम गमावण्यास तयार असणे [२] बदलीचा संपूर्ण खर्च सोसण्यास तयार असणे [३] ज्या विभागात बदली हवी आहे त्या विभागात कोठेही काम करण्याची तयारी आणि [४] बदलीचा आदेश मिळाल्यानंतर तो रद्द करण्यास विनंती न करणे इत्यादी कर्मचाऱ्याने मान्य करणे आवश्यक आहे.

[१०] दरवर्षीच्या बदल्या वर्षातून फक्त दोन वेळा म्हणजे जूनच्या पहिल्या आठवड्यात व डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात प्रादेशिक व्यवस्थापक/कार्यशाळा व्यवस्थापक यांनी एकमेकांशी चर्चा करुन लेखी संमतीने उपरोक्त सर्व बाबी विचारात घेऊन करावयाच्या आहेत.

[११] एकवेळ बदली झालेल्या कर्मचाऱ्याने परत बदलीसाठी अर्ज केल्यास त्याची किमान ५ वर्षाची अखंड सेवा होईपर्यंत परत बदली करण्यात येऊ नये. सदर परिपत्रकातील तरतुदी / सूचना सर्व कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्याव्यात. ज्यांचे बाबतीत सर्व तरतुदी पूर्ण होत असतील अशाच कर्मचाऱ्यांनी अर्ज करावेत याबाबत सूचना द्याव्यात.

सर्व प्रादेशिक व्यवस्थापक/कार्यशाळा व्यवस्थापक विनंती बदल्यांसंबंधी निर्णय घेण्यासाठी त्यांच्या सोईने एकत्र येतील व बदलीची प्रकरणे निकाली काढतील. सदरचे बदली करण्याबाबतचे अधिकार प्रायोगिक तत्वावर प्रथम: सुरुवातीस ३ वर्षाकरिता देण्यात येत आहेत. त्यानंतर योजनेचा आढावा घेण्यात येईल व त्यानुसार सदरचे अधिकार प्रादेशिक व्यवस्थापकांना पुढे अंमलात आणू द्यावयाचे किंवा नाही याविषयी निर्णय घेतला जाईल.

आपल्या प्रादेशिक विभागातील कर्मचाऱ्यांनी विनंतीवरुन बदलीसाठी या कार्यालयास सादर केलेले अर्ज आपणास सुपूर्द करावयाचे असल्याने आपला प्रतिनिधी मध्यवर्ती कार्यालयात दिनांक १५.९.९४ पर्यंत पाठवावा.

उपरोक्त बाबींची नोंद घ्यावी व कर्मचाऱ्यांच्या बदली बाबतच्या तक्रारी उद्भवणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

सही/- एस. आर. पाटील
उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक.

सोबत: वरीलप्रमाणे.